# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 02/12/2019 (सोमवार)
# (सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर वडोदा येथे दिनांक 01/12/2019 चे 21.15 वा. दरम्यान पोलीस नियत्रण कक्ष नागपुर येथून पो.स्टे मौदाच्या फोन वर सुचना मिळाली, की वडोदा येथे शंकर दारोडे यांचे शेतात गोवंश जनावरे कत्तली करीता नेण्यासाठी बांधुन ठेवले आहेत. अश्या माहिती वरून पो. स्टे. मौदा येथील पोलिस पथक रवाना झाले. पो. स्टे. मौदा येथील स्टाफ शंकर दारोडे यांचे शेतात गेले असता रस्त्याच्या कडेला एमएच– 34/ऐबी – 6574 क्रमांकाची झेनॉन पिकअप तपासले असता त्यामध्ये एकुण 54 (गाई,गोरे) कि. 6,50,000/–रू. ही जनावरे मिळुन आली. वाहन मधील आरोपी नामे– विलास भोला सेलोकर, वय 32 वर्श, रा. शहापुर जवाहरनगर जि. भंडारा याच्या ताब्यातुन वाहनासह असा एकुण किंमती 7,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री मंगेश काळे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),5(ब),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 109 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री मंगेश काळे हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा काचुरवाही येथे दिनांक 30/11/2019 चे 11:00 वा ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेश शंकर हटवार, वय 52 वर्ष, रा. काचुरवाही यांच्या घरातील खुल्या दारातुन अज्ञात आरोपीने घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील कपाटात ठेवलेल सोन्या–चांदीचे दागिने कि. 11,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अजय इंकळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर